श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## श्रीमद्भगवद्गीता षोडशो अध्याय



पार्थ सारथी ने समझाया धर्म -कर्म का ज्ञान,
मानव जीवन सफल बना ले गीता अमृत मान।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**

**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

विजयाचे साधन असलेल्या या श्रीमद्भागवताचे पठण करण्यापूर्वी, एखाद्याने भगवान नारायण, परम मानव नर-नारायण ऋषी, विद्येची देवी माता सरस्वती आणि लेखक श्रील व्यासदेव यांना आदरपूर्वक नमस्कार केला पाहिजे.

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**

**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

मी परमप्रभू हरि यांना आदरपूर्वक वंदन करतो, ज्यांच्या पवित्र नावांचा सामूहिक जप सर्व पापी प्रतिक्रियांचा नाश करतो आणि ज्यांच्या प्रणाम अर्पण केल्याने सर्व भौतिक दुःख दूर होतात.

**श्रीमद्भगवद्गीतायां(म्)**

**षोडशोध्यायः**

**श्रीभगवानुवाच**

**अभयं(म्) सत्त्वसं(म्)शुद्धिर्- ज्ञानयोगव्यवस्थितिः।**

**दानं(न्) दमश्च यज्ञश्च, स्वाध्यायस्तप आर्जवम्॥ 1 ॥**

श्री भगवान म्हणाले ,भयाचा पूर्ण अभाव,अंतःकरणाची पूर्ण निर्मळता,तत्त्वज्ञानाकरता ध्यान योगात निरंतर दृढ स्थिती आणि सात्विक दान,इंद्रियांचे दमन,भगवान,देवता आणि गुरुजनांची पूजा ,तसेच अग्निहोत्र इत्यादी उत्तमकर्मांचे आचरण,त्याचप्रमाणे वेदशास्त्रांचे पठण-पाठन,भगवंतांच्या नामांचे व गुणांचे कीर्तन,सदर माझे पालन करण्यासाठी कष्ट सोसणे आणि शरीर व इंद्रियांसह अंतःकरणाची सरलता .

अहिं(म्)सा सत्यमक्रोधस्- त्यागः(श्) शान्तिरपैशुनम्।

दया भूतेष्वलोलुप्त्वं(म्), मार्दवं(म्) ह्रीरचापलम् ॥ 2 ॥

काया -वाचा -मनाने कोणालाही कोणत्याही प्रकारे दुःख न देणे ,यथार्थ व प्रिय भाषण ,आपल्यावर अपकार करणाऱ्यावरही न रागावणे ,कर्मांच्या ठिकाणी कर्तेपणाच्या अभिमानाचा त्याग ,अंतःकरणात चंचलता नसणे ,कोणाचीही निंदा वगैरे न करणे ,सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी निर्हेतुक दया ,इंद्रियांचा विषयांशी संयोग झाला तरी त्यांच्याविषयी आसक्ती न वाटणे ,कोमलता ,लोकविरुद्ध व शास्त्र विरुद्ध आचरण करण्याची लज्जा ,निरर्थक हालचाली न करणे .

तेजः(ह) क्षमा धृतिः(श्) शौच- मद्रोहोनातिमानिता।

भवन्ति सम्पदं(न्) दैवी- मभिजातस्य भारत ॥ 3 ॥

तेज ,क्षमा ,धैर्य ,बाह्य शुद्धी ,कुणाविषयी हीशत्रुत्व न वाटणे आणि स्वतः विषयी मोठेपणाचा अभिमान नसणे -ही सर्व हे अर्जुना !दैवी संपत्ती घेऊन जन्मलेल्या माणसाची लक्षणे आहेत .

दम्भो दर्पोऽभिमानश्च, क्रोधः(फ्) पारुष्यमेव च।

अज्ञानं(ञ्) चाभिजातस्य, पार्थ सम्पदमासुरीम् ॥ 4 ॥

हे पार्था !ढोंग ,घमेंड ,अभिमान ,राग ,कठोरपणा आणि अज्ञान ही सर्व आसुरी संपत्ती घेऊन जन्मलेल्या पुरुषांची लक्षणे आहेत .

दैवी सम्पद्विमोक्षाय, निबन्धायासुरी मता।

मा शुचः(स्) सम्पदं(न्) दैवी- मभिजातोऽसि पाण्डव ॥ 5 ॥

दैवी संपदा मुक्तीदायक आणि आसुरी संपदा बंधनकारक मानली आहे . म्हणून हे अर्जुना !तू शोक करू नकोस .कारण तू दैवी संपदा घेऊन जन्मला आहेस .

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्- दैव आसुर एव च।

दैवो विस्तरशः(फ्) प्रोक्त, आसुरं(म्) पार्थ में श्रृणु ॥ 6 ॥

हे अर्जुना !या जगात मनुष्य समुदाय दोनच प्रकारचे आहेत .एक दैवी प्रकृतीचे आणि दुसरे असुरी प्रकृतीचे.त्यांपैकी दैवी प्रकृतीचे विस्तार पूर्वक सांगितले .आता तू असुरी प्रकृतीच्या मनुष्य समुदायाबद्दलही माझ्याकडून सविस्तर ऐक .

प्रवृत्तिं(ञ्) च निवृत्तिं(ञ्) च, जना न विदुरासुराः।

न शौचं(न्) नापि चाचारो, न सत्यं(न्) तेषु विद्यते ॥ 7 ॥

आसुरी स्वभावाचे लोक प्रवृत्ती आणि निवृत्ती दोन्हीही जाणत नाही त.त्यामुळे त्यांच्या ठिकाणी अंतर्बाह्य शुद्धी असत नाही .उत्तम आचरण असत नाही आणि सत्य भाषण ही नाही असत नाही .

असत्यमप्रतिष्ठं(न्) ते, जगदाहुरनीश्वरम्।

अपरस्परसम्भूतं(ङ्), किमन्यत्कामहैतुकम् ॥ 8 ॥

ते आसुरी स्वभावाचे मनुष्य असे सांगतात ,की हे जग आश्रय रहित सर्वथा खोटे आणि ईश्वराशिवाय आपोआप केवळ स्त्री-पुरुषांच्या सं योगांतून उत्पन्न झाले आहे .म्हणूनच केवळ 'काम ' हेच त्यांचे कारण आहे त्याशिवाय दुसरे काय आहे ?

एतां(न्) दृष्टिमवष्टभ्य, नष्टात्मानोऽल्पबुद्धयः।

प्रभवन्त्युग्रकर्माणः(ह), क्षयाय जगतोऽहिताः ॥ 9 ॥

या खोट्या ज्ञानाचा अवलंब करून ज्यांचा स्वभाव भ्रष्ट झाला आहे आणि ज्यांची बुद्धी मंद आहे असे सर्वांवर अपकार करणारे क्रूरकर्मी मनुष्य केवळ जगाच्या नाशाला समर्थ होतात .

काममाश्रित्य दुष्पूरं(न्), दम्भमानमदान्विताः।

मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्-प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः ॥ 10 ॥

ते दंभ ,मानव आणि मधाने युक्त असलेले मनुष्य कोणत्याही प्रकारे पूर्ण न होणाऱ्या कामनांचा आश्रय घेऊन अज्ञानाने खोटे सिद्धांत स्वीकारून भ्रष्ट आचरण करीत जगात वावरत असतात .

चिन्तामपरिमेयां(ञ्) च, प्रलयान्तामुपाश्रिताः।

कामोपभोगपरमा, एतावदिति निश्चिताः ॥ 11 ॥

तसेच ते आमरणांत असंख्य चिंतांचे ओझे घेतलेले विषय भोग भोगण्यात तत्पर असलेले हाच काय तो आनंद आहे असे मानणारे असतात .

आशापाशशतैर्बद्धाः(ख्), कामक्रोधपरायणाः।

ईहन्ते कामभोगार्थ- मन्यायेनार्थसञ्चयान्॥ 12 ॥

शेकडो अशांच्या पाशांनी बांधले गेलेले ते मनुष्य काम क्रोधात बुडून जाऊन विषय भोगांसाठी अन्यायाने द्रव्या दी पदार्थांचा संग्रह करण्याचा प्रयत्न करीत असतात .

इदमद्य मया लब्ध- मिमं(म्) प्राप्स्ये मनोरथम्।

इदमस्तीदमपि मे, भविष्यति पुनर्धनम् ॥ 13 ॥

ते विचार करतात की ,मी आज हे मिळविले आणि आता मी हा मनोरथ पूर्ण करीन .माझ्याजवळ हे इतके द्रव्य आहे आणि पुन्हा सुद्धा हे मला मिळेल .

असौ मया हतः(श्) शत्रुर्- हनिष्ये चापरानपि।

ईश्वरोऽहमहं(म्) भोगी, सिद्धोऽहं(म्) बलवान्सुखी ॥ 14 ॥

या शत्रूला मी मारले आणि त्या दुसऱ्या शत्रूंनाही मी मारीन .मी ईश्वर आहे ,ऐश्वर्या भोगणारा आहे .मी सर्व सिद्धी नियुक्त आहे आणि बलवान तसाच सुखी आहे .

आढ्योऽभिजनवानस्मि, कोऽन्योऽस्ति सदृशो मया।

यक्ष्ये दास्यामि मोदिष्य, इत्यज्ञानविमोहिताः ॥ 15 ॥

अनेकचित्तविभ्रान्ता, मोहजालसमावृताः।

प्रसक्ताः(ख्) कामभोगेषु, पतन्ति नरकेऽशुचौ ॥ 16 ॥

मी मोठा धनिक आणि मोठ्या कुळात जन्मलेला आहे .माझ्यासारखा दुसरा कोण आहे ?मी यज्ञ करीन .दाने देईन .मजेत राहीन .अशाप्रकारे अज्ञानाने मोहित झालेले 'अनेक प्रकारांनी भ्रांत चित्त झालेले ,मोहाच्या जाळ्यात अडकलेले आणि विषय भोगांत अत्यंत आसक्त असे आसुरी लोक महा अपवित्र नरकात पडतात .

आत्मसम्भाविताः(स्) स्तब्धा, धनमानमदान्विताः।

यजन्ते नामयज्ञैस्ते, दम्भेनाविधिपूर्वकम्॥ 17 ॥

ते स्वतःला असं श्रेष्ठ मानणारे घमेंडखोर लोक धन आणि मान यांच्या मदाने  उन्मत्त होऊन केवळ नावाच्या यज्ञांनी पाखंडी पणाने शास्त्रविधीहीन यज्ञ करतात .

अहङ्कारं(म्) बलं(न्) दर्पं(ङ्), कामं(ङ्) क्रोधं(ञ्) च सं(म्)श्रिताः।

मामात्मपरदेहेषु, प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः ॥ 18 ॥

ते अहंकार ,बळ ,घमेंड ,कामना आणि क्रोधा दिकांच्या आहारी गेलेले आणि दुसऱ्यांची निंदा करणारे पुरुष आपल्या व इतरांच्या शरीरांत असलेल्या मज अंतर्यामीचा द्वेष करणारे असतात .

तानहं(न्) द्विषतः(ख्) क्रूरान्- सं(म्)सारेषु नराधमान्।

क्षिपाम्यजस्रमशुभा- नासुरीष्वेव योनिषु ॥ 19 ॥

त्या द्वेष करणाऱ्या,पापी'क्रूरकरमे करणाऱ्या नराधमांना मी संसारात वारंवार आसुरी योनीतच टाकतो.

आसुरीं(यँ) योनिमापन्ना, मूढा जन्मनि जन्मनि।

मामप्राप्यैव कौन्तेय, ततो यान्त्यधमां(ङ्) गतिम् ॥ 20 ॥

हे अर्जुना !ते मूळ मला प्राप्त न होता जन्मोजन्मी असुरी योनीतच जन्मतात .उलट्याहूनही अति नीच गतीला प्राप्त होतात .अर्थात घोर नरकांत पडतात .

त्रिविधं(न्) नरकस्येदं(न्), द्वारं(न्) नाशनमात्मनः।

कामः(ख्) क्रोधस्तथा लोभस्- तस्मादेतत्त्रयं(न्) त्यजेत् ॥ 21 ॥

काम ,क्रोध आणि लोह ही तीन प्रकारची नरकाची दारे आत्म्याचा नाश करणारी अर्थात त्याला अधोगतीला नेणारी आहेत .म्हणूनच त्या तिहिंचा त्याग करावा .

एतैर्विमुक्तः(ख्) कौन्तेय, तमोद्वारैस्त्रिभिर्नरः।

आचरत्यात्मनः(श्) श्रेयस्- ततो याति परां(ङ्) गतिम् ॥ 22 ॥

हे अर्जुना !या तिन्ही नरकाच्या दारांपासून मुक्त झालेला पुरुष आपल्या कल्याणाचे आचरण करतो .त्याने तो परमगती मिळवतो अर्थात मला येऊन मिळतो .

यः(श्) शास्त्रविधिमुत्सृज्य, वर्तते कामकारतः।

न स सिद्धिमवाप्नोति, न सुखं(न्) न परां(ङ्) गतिम् ॥ 23 ॥

जो मनुष्य शास्त्राचे नियम सोडून स्वतःच्या मनाला वाटेल तसे वागतो,त्याला सिद्धी मिळत नाही,परमगती मिळत नाही आणि सुखही मिळत नाही .

तस्माच्छास्त्रं(म्) प्रमाणं(न्) ते, कार्याकार्यव्यवस्थितौ।

ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं(ङ्), कर्म कर्तुमिहार्हसि ॥ 24 ॥

म्हणून तुला कर्तव्य आणि अकर्तव्य यांची व्यवस्था लावण्यात शास्त्रच प्रमाण आहे ,असे जाणून तू शास्त्रविधीने नेमलेले कर्मच करणे योग्य आहे .

इति श्रीमहाभारते भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतापर्वणि

श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां(यँ) योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसं(वँ)वादे

दैवासुरसम्पद्विभागयोगो नाम षोडशोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शांतिः(श्) शांतिः(श्) शांतिः ॥

"तो (परब्रह्म) पूर्ण आहे, हे (सृष्टी) देखील पूर्ण आहे; पूर्णामधून पूर्ण निर्माण होते, आणि पूर्ण घेऊन (निर्मितीनंतरही) पूर्णच उरते."